श्रीमती गंगुबाई राघोजी साळवे चॅरिटेबल

ट्रस्ट द्वारा प्रस्तावित

SGRS CHARITABLE TRUST



# धम्मगंगा बुद्ध विहार

# ध्यान आणि विपश्यना केंद्र

# शेतकरी मार्गदर्शन, विविध प्रशिक्षण केंद्र,

जळगाव ( सपकाळ ), ता. भोकरदन, जि. जालना.



||अत्त दिप भव||

श्रीमती गंगुबाई राघोजी साळवे चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा प्रस्तावित



# भव्य धम्मगंगा बुध्द विहार, ध्यान आणि विपश्यना केंद्र व शेतकरी मार्गदर्शन, विविध प्रशिक्षण केंद्र,

जळगांव (सपकाळ), ता.भोकरदन, जि.जालना

''उध्दरली कोटी कुळे, भिमा तुझ्या जन्मामुळे'' - लोककवी वामनदादा कर्डक...

आपल्या सर्व बांधवास आमचा सप्रेम जयभिम / नमस्कार आपणापुढे हि पुस्तिका सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे कि, माझ्या ३८ वर्षाच्या भारतीय रिझर्व बँक आणि राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या सेवानिवृत्तीनंतर समाजाचे उतराई व्हावे म्हणून हे धम्मकार्य करण्याचे ठरविले आहे. नोकरीच्या काळात महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर राहिल्यामुळे मुळगावी जळगाव (सपकाळ), ता.भोकरदन, जि.जालना येथे काही कार्य करता आले नव्हते. त्याची खंत होती म्हणून, आता ग्रामीण भागातील शेतकरी, युवा, महिला व सामाजीक व त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. हे करीत असतांना आम्ही प्रथम श्रीमती गंगुबाई राघोजी साळवे चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली आहे.

तथागत भगवान बुध्दाच्या धम्माचे भारतात पुनरूज्जीवन करण्याचे महान ऐतिहासिक कार्य दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द धम्माचा स्विकार करून केले. यामुळे या देशात महान सामाजिक व धार्मिक क्रांती घडून आली. भारतभुमीतील राष्ट्रीय प्रवाहात सुसंगत असा धम्माचा स्विकार करून त्यांनी सामाजिक समतेबरोबरच या देशाचा प्रगल्भ आणि पुरोगामि असा सांस्कृतिक वारसा जपला.

बुध्दाचा धम्म हा चार आर्य सत्य, पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, प्रत्युत्य समुत्पाद, विशुध्दीच्या प्रगती पथाचा सर्व मानवासाठी खुला शांतीचा मार्ग आहे.

एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ''माझ्या समाजाच्या जीवनाबद्दल मला स्वतःच्या अनुभवाने माहिती झालेली आहे. आपल्या दुःखी, दीन दरिद्री समाजासाठी काही तरी करावे, या प्रेरणेने, मी त्याच्यासाठी झटलो आहे. माझ्या मध्ये जे काही सर्वोत्कृष्ट असेच मी त्यांना दिले आहे. पण हे करित असतांना, मी पूर्ण विचार करून आणि जाणिवेने प्रत्येक पाऊल टाकले आहे. मी कधी कुणाच्या राग आणि लोभाची पर्वा केली नाही.''

बाबासाहेबांचा हाच संदेश शिरोधार्य मानून, ग्रामीण भागात बौध्द संस्कृतीचे संवर्धन, बौध्द विहार, आर्थिक उन्नतीसाठी व्यवसायिक मार्गदर्शन केंद्र, शेतकऱ्यासाठी साहाय्य, महिलांसाठी स्वालंबनाचे मार्गदर्शन, विपश्यना, अध्यात्मिक तसेच आरोग्य विषयक शिबिर आयोजित करण्याचे आमच्या संस्थेने ठरविलेले आहे.

सदर संस्था/ ट्रस्ट हे पब्लिक ट्रस्ट १९५० च्या कायद्यानुसार नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेची नोंदणी १५ मे २०१४ रोजी ठाणे धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात क्रमांक ई/८७३०/ठाणे प्रमाणे झालेली आहे. आज मीतीस संस्थेने सर्व स्थरावर आपल्या कार्याची नोंद केली आहे. ही संस्था कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसून, संपूर्णपणे धर्म निरपेक्ष वादी आहे. तसेच या संस्थेच्या पाठीमागे कार्यकुशल, अनुभवी, प्रामाणिक आणि सचोटिच्या कार्यक्रत्यांचे पाठबळ आहे. सदर संस्थेने दान स्विकारण्यास पात्र संस्था म्हणून आवश्यक ती परवानगी मिळवलेली आहे.

**संस्थेचे ध्येय, उदिष्टे आणि पुढील प्रकल्पः**

सांस्कृतिक मुल्यांची जोपासना, ग्रामीण भागातील राहणीमान सुधारण्यासाठीचे प्रयत्न शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन, महिला सशक्तीकरण व स्वालंबनाचे मार्ग, शैक्षणिक आणि ध्यान धारणा, विपश्यना आणि आरोग्य शिबिर आयोजित करणे या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी सध्या संस्थेने हाती घेतलेले कार्यक्रम खालील प्रमाणे आहेत.

१. धम्म गंगा बुध्द विहार - बुध्द विहार हे बुध्द काळापासून सांस्कृतिक मुल्याची जोपासना करणारे केंद्र आहे. विहार निर्मितीचा उल्लेख पाली साहित्यात आढळतो. पुढे सम्राट अशोकाने देशाच्या सर्व दिशेने विहार स्थापन्याची जणू चळवळ सुरू केली होती. विहार हे सामूहिक चर्चा करण्याचे ठिकाण आहे विहार हे शैक्षणिक मूल्याची जोपासना करण्याचे प्रमुख केंद्र आहे. जो भ्रामक समजूतीला दुर सारतो आणि जिवनाच्या खरा अर्थ सांगण्यास समर्थ होतो असे शिक्षण आवश्यक आहे. बौध्द समाजाच्या दृष्टीने विचार केल्यास आजच्या परिस्थितीत बुध्द विहाराची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत आहे. हेच सुत्र लक्षात घेऊन श्रीमती गंगूबाई राघोजी साळवे चॅरिटेबल ट्रस्टने जळगांव सपकाळ, ता.भोकरदन, जि. जालना येथे धम्म गंगा बुध्द विहाराची कोणशीला दि.११ सप्टेंबर २०१६ रोजी पुज्य भन्ते विमलकिर्ती महा स्थवीर यांच्या हस्ते करण्यात आले. हे बांधकाम अतिशय प्रगती पथावर आहे.









२. धम्म परिषदेचे आयोजन :

बौध्द धम्मांचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून दरवर्षी धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येते. या परिषदेसाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेरील उपासक आणि उपासकांना, मान्यवरांना आणि पुज्य भन्तेजींना आमंत्रित करण्यात येते. आतापर्यंत पुज्य भन्ते बोधी पालो स्थवीर, पुज्य डॉ. एम. सत्यपाल स्थवीर आणि अखिल भारतीय भिख्खू संघातील प्रमुख भिक्खुनी आपली उपस्थिती लावलेली आहे. सदर धम्म परिषदेमध्ये धम्म मिरवणुक, धम्म ध्वजारोहन, भिक्खु संघास भोजनदान व चिवरदान, पुज्य भन्तेजींचे प्रवचन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. साधारण १२ ते १५ हजार उपासक - उपासिकेच्या उपस्थित या धम्म परिषद पार पाडल्या आहेत. या कार्यक्रमानंतर भिम आणि बुध्द गीते गायनाचा कार्यक्रम होतो.

३. विपश्यना / ध्यान साधना केंद्र - आयुष्यात प्रत्येक मनुष्यास सुख व शांतीची आवश्यकता आहे. दुःख, राग, द्वेष, संताप, आर्थिक व सामाजिक अडचणीवर मात करण्यासाठी विपश्यना ध्यान साधनेचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. २५०० वर्षांपूर्वी तथागत भगवान बुध्दानी अथक प्रयत्नातून ज्ञान प्राप्त केली. ध्यानासाठी जी साधना केली त्या साधनेस विपश्यना म्हणतात. आपल्या मानसिक, शारीरीक व वाचा यांच्या हालचालीकडे तटस्थपणे पाहण्याची क्रिया व त्याचा सराव करणे म्हणजे विपश्यना ध्यान होय. यालाच विशुध्दी मार्ग असेही म्हणता येईल. १९६५ च्या दरम्यान विपश्यना ब्रम्हदेशातुन विपश्यनाचार्य आदरणीय गोयंका गुरूजींच्या माध्यमातुन भारतात परत आली विपश्यनाचार्य आदरणीय गोयंका गुरूजींच्या माध्यमातुन भारतात परत आली आणि आज संपूर्ण जगात विपश्यनाच्या आधारे करोडोच्या संख्येने लोक विपश्यना करीत आहे. ग्रामीण भागात विपश्यनेचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून संस्थेने धम्मगंगा बुध्द विहार जळगांव (सपकाळ), ता. भोकरदन, जि. जालना येथे विपश्यना केंद्राची स्थापना करण्याचा माणस आहे. या विहारात सध्या ५० साधकांच्या योग साधनेची बेठकीची सोय करण्यात आलेली आहे. ज्यांना कुणाला विहारात येऊन ध्यान साधना, विपश्यना व ध्यान धारणा करायची असेल त्यांनी विहार प्रबंधन समिती किंवा भिक्खु संघाकडे विचारणा करावी.









४. शेतकरी मार्गदर्शन केंद्र : सतत घटत जाणारे शेतमालाचे उत्पादन, घसरत जाणारी जमीनीची पोत, वेगात वाढत जाणारा उत्पाददनाचा खर्च व घटत जाणारे बाजार भाव या चौपदरी संकटात सध्याचा शेतकरी वर्ग अडकला आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी व योग्य मार्गदर्शन करण्यासाठी जळगाव सपकाळ येथे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येतात. शेती व्यवसायातील विविध तंत्रे, नैसर्गिक शेती तथा सेंद्रीय शेती, उत्पादन खर्चाची कपात आणि नफ्याची शेती कशी करता येईल यावर कृषी तज्ञ, बँक अधिकारी व संबंधीत व्यक्तीचे व्याख्याने आयोजित करण्यात येतात, याचा लाभ शेतकऱ्यांना होत आहे.

सदर ट्रस्टचे संस्थापक आयु.कृष्णा साळवे यांनी पंजाबराव कृषी विद्यापिठाचे मा.कुलगुरू साहेबांच्या सोबत जालना जिल्हयातील कडवंची वॉटर शेड प्रकल्पाला भेट देऊन विविध प्रश्नांवर चर्चा केली. यामध्ये मा.बोराडे साहेब (अध्यक्ष मराठवाडा शेती साहाय्य मंडळ, औरंगाबाद व कृषी विज्ञान केंद्र जालन्याचे प्रभारी श्री.सोनवणे सोबत दिसत आहेत. शेतकऱ्यांसाठी विविध मार्गदर्शन आयोजित करणे हेच संस्थेचे उदिष्टे व ध्येय आहे, त्याचाच एक भाग म्हणुन दरवर्षी शेतकरी सहल आयोजित करण्यात येते. यावर्षी ही सहल कृषी विज्ञान केंद्र, बारामतीसाठी आयोजित केली होती. यात १५ ते २० शेतकऱ्यांनी भाग घेऊन नविन टेक्नोलॉजीचा वापर केला.

५. शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन : यामध्ये १०वी व १२वी नापास झालेल्या विद्यार्थ्यांना योग्य शिक्षकांकडून मार्गदर्शन देऊन त्यांना पास होण्यास मदत करणे. पास झालेल्या विद्यार्थ्यांना डायरेक्टर ऑफ व्होकेशनल गाईडन्सच्या मदतीने व्यवसाय मार्गदर्शन करणे. होतकरू विद्यार्थ्यांना कम्प्युटर व मोबाईल रिपेअरींग व अन्य व्यवसायाबद्दलची माहिती देऊन रोजगारांसाठी मदत करणे. ह्यासाठी संस्थेने कार्य सुरू केले आहे.





६. महिला सशक्तीकरण, आरोग्य व वैद्यकीय मदत - संस्थेतर्फे ग्रामीण युवक - युवती व महिलांसाठी विविध प्रशिक्षणाची सोय करणे. तसेच बचत गट स्थापनकरून मायक्रो फायनान्सच्या माध्यमातून महिला सशक्तीकरण करणे. तसेच वैद्यकीय दवाखाना सुरू करून तेथे औरंगाबाद, जालना व इतर शहरातील नामांकित डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. अत्यंत गरीब व गरजू रोग्यांना औषध उपलब्ध करणे. उदा. रक्तदान, नेत्रदान व कुटूंब कल्याण शिबिर आयोजित करणे.

धम्मगंगा बुध्द विहार येथे महिला सक्षमीकरणांसाठी विविध कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. २०१८-१९ या काळात धम्मगंगा बुध्दविहार येथे महिला घरगुती उत्पादनाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात साधारण १५० ते २०० महिलांनी सक्रिय भाग घेतला होता तसेच पुज्य भन्ते जयंत बोधी महाथेरो यांच्या सहकार्याने टेलरिंगचा क्लास सुध्दा भरविण्यात आला होता. दि.३० मे २०१९ रोजी महिलांच्या बचत गटासाठीचे बैठक व पुढे त्यांचे प्रशिक्षण करण्यासाठी एक सहल सुध्दा आयोजीत केली.

अहमदाबाद (गुजरात) वरून २० ते २५ महिला खास करून धम्मगंगा बुध्द विहार बघण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी ३ दिवसाचे प्रशिक्षण घेतले.







७) क्रिडा व समता सैनिक दल - सदर संस्था समता सैनिक दलाची स्थापना करून ग्रामीण भागातील तरूण व तरूणीना लष्करी शिस्त व शारीरिक कवायत, देऊन त्याच्यात शारीरिक जोम व वक्तशीरपणा निर्माण करून त्यांचे व्यक्तीमत्व विकास करणे तसेच त्यांना आंबेडकर चळवळीत आणणे. इच्छुक व होतकरू तरूण तरूणींना पोलीस दल व सैनिक भरतीसाठी तयार करणे यासाठी प्रयत्नशील आहे.




८) विविध सामाजिक उपक्रमे : तालुका स्तरीय बैठक व आयोजन करण्यात येते. येथे सामाजिक व आर्थिक बाबींवर विचार विमर्ष करून बचत गटांच्या माध्यमातुन ग्रामिण जनतेचे उत्पन्न कसे वाढेल व रोजगार कसा मिळवता येतील याची ही चर्चा केली जाते.

अ) धम्मपद या ग्रंथाचे मराठी भाषांतर : आयु.कृष्णा साळवे यांनी मुळ पाली ग्रंथ ''धम्मपद'' चे मराठी भाषांतर केले असुन या ग्रंथाचे विमोचन डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठाचे मा.कुलगुरू डॉ.चोपडे यांनी दि.२६ फेब्रुवारी २०१९ रोजी केले. या कार्यक्रमात शिक्षण महर्षी माधवराव बोरडे, सुखदेवे साहेब (रिजर्व बँक व नाबार्डचे निवृत्त मुख्य महाप्रबंधक), डॉ.आर.आर.वानखेडे (ओ.एन.जी.सी.चे निवृत्त महाप्रबंधक) प्रा.डॉ.अशोक पवार (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ) आणि डॉ.भन्ते एम.सत्यपाल (पाली विभागप्रमुख) यांच्या उपस्थित हा विमोचन सोहळा पार पडला. ही धम्मपद मराठी आवृत्ती सर्वांना आवडली असून फार कमी वेळात आवृत्ती संपत आलेली आहे व दुसऱ्या आवृत्तीची तयारी चालू आहे.

ब) व्याख्यानमाला : SGRSCT संस्थेने औरंगाबाद येथील साई पार्क को.ऑ.हॉ.सोसायटी व सम्यक उपासक - उपासिका बौध्द महासंघाच्या मदतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या १२८ व्या जन्म जयंती निमित्ताने व्याख्यान मालेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात औरंगाबाद येथील कॅन्सर हॉस्पीटलचे डिन डॉ.अरविंद गायकवाड, प्रसिध्द उद्योगपती श्री.मिलिंद पाटील, निवृत्त पोलिस सहाय्यक आयुक्त किरणकुमार चाटे व शिवाजीराव चाटे व अन्य मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.










क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय औरंगाबादच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात संस्थेचे ट्रस्टी आयु.कृष्णा साळवे यांचा दि.३ मे २०१९ रोजी गौरव करण्यात आला. या प्रसंगी आयु.साळवे यांनी उपस्थितांना व्यक्तीगत विकास व स्वअनुभव संबोधित करीत असताना.

ड) वृक्षारोपन : धम्मगंगा बुध्द विहार येथे शाळकरी मुलांच्या कडुन वृक्षारोपनाचा कार्यक्रम दि.२५ जुलै २०१८ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात जिल्हा प्रशाला, जळगांव, विनय विद्यालय व आदिवासी रहिवाशी शाळा या सर्वांनी मिळुन ४०० पेक्षा जास्त झाडांची लागवड केली होती.

९) आंतर शालेय क्रिडा स्पर्धा :

संस्थेचे प्रेरणास्थान कालकथीत राघोजी रामजी साळवे यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने २१ ऑक्टोबर २०१८ रोजी जळगांव येथील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आंतर विद्यालयीन खेळांचे आयोजन केले होते. ह्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेच्या अध्यक्षा आयु.लक्ष्मीबाई साळवे व विनय विद्यालयाचे प्राचार्य श्री.कुंटे यांच्या हस्ते करण्यात आले. एकंदरीत जवळपासच्या सहा शाळांमधुन ४५० ते ५०० विद्यार्थी - विद्यार्थीनीनी विविध खेळात भाग घेऊन आप आपले प्राविण्य दाखविलेले होते.







१०) विविध धार्मिक कार्य : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापित प्रथम बुध्दमुर्ती देहुरोड बौध्द विहार येथुन दरवर्षी निघणारा धम्मरथ हा दिक्षाभुमी, नागपुरला जात असतो. यावर्षी दि.२७ आक्टोबर २०१८ ला या धम्मरथाचे आगमन धम्मगंगा बुध्द विहारात झाले. धम्म रथाचे सर्वे सर्वा प्रा.वाहुळ यांनी आपले विचार प्रखरपणे मांडले व उपस्थितांना धम्मपालनाचे महत्त्व सांगितले.

तिसऱ्या धम्म परिषदेच्या निमित्ताने आदरणीय सप्तखंजेरी वादक व किर्तनकार श्रीसतपाल महाराज चिंचोलीकर, अकोट जि.अकोला यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाला एकंदरीत १२ ते १५ हजार प्रेषकांनी उत्स्फूर्त दाद दिली याच कार्यक्रमात कलर टि.व्ही. फेम संत गाडगे बाबा यांच्या वेशातुन आयु.अनिल मगर यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

सप्टेंबर २०१९ पर्यंत संस्थेने केलेली प्रगती.

१. नोंदणीकृत झाल्यानंतर लगेच २०१४-१५ या वर्षी शेतकरी व ग्रामीण युवकासाठी शैक्षाणिक सहल, कृषि विज्ञान केंद्र. बारामती येथे काढण्यात आली. त्यानंतर ४ विविध प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. २. जळगांव सपकाळ ता. भोकरदन, जि. जालना येथे धम्मगंगा बौध्द विहाराचे नियोजन करण्यात आले. व त्यासाठी ३.७५ एकर जमीनीची निवड करण्यात आली.

३. निवड केलेल्या जागेवर ६०० पेक्षा जास्त विविध झाडांचे रोपण करण्यात आले. तेथे बोअरवेल घेऊन साधारण १००० फुटाची पाईपलाईन करून झाडांना ठिंबक सिंचनाची सोय करण्यात आली.

४. सदर जागेस तारेचे कुंपन करण्यात आले. ५. सदर जागेवर पोहोचण्यासाठी साधारण ९०० मीटरची सडक बनविण्यात आली.

६. संस्थेने आतापर्यंत, शेतकऱ्यांसाठी ४ कार्यशाळा, २ जनजागृती कार्यक्रम आणि सामुहिक मेळावे घेतले आहेत. ज्यात शेकडो शेतकरी व ग्रामीण तरूणांनी भाग घेतला होता.

७. २० **X** ८० फुटांचे तात्पुरते शेड बांधले आहे. त्यात दोन खोल्या प्रत्येकी १००-१५० माणसे बसू शकतील एवढी क्षमता आहे.

८. या जागेवर भिक्खुसंघाचे वास्तव्य राहावे म्हणून सुंदर भिक्खु निवास बांधण्यात आले आहे.

९. ग्रामीण भागातून धार्मिकता वाढावी व लोकांना बुध्द धर्मांचे आकर्षण व्हावे म्हणून एक सुंदर व मनमोहक आशिर्वाद मुद्रा असलेली बुध्द मुर्ती उडिसा राज्यातून आणली आहे. तसेच थायलंडवरून पंचधातुची सोन्याचा मुलामा असलेली आर्कषक असलेली मुर्ती सुध्दा आणलेली आहे.

१०. बौध्द धम्मांचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून दरमहा पोर्णिमेचे आयोजन केले जाते.

११. विविध प्रशिक्षण शिबीरे ध्यान साधना व धम्म गंगा बुध्द विहाराचे बांधकाम जोरात सुरू आहे.

**सदर प्रकल्पाचा एकंदरीत खर्च अंदाजे रू. ९४० लाख असुन संस्थेच्या संचालकांनी स्वताःच्या निधितुन आतापर्यंत रू.१३२ लाख खर्च केलेले आहेत व अपेक्षा आहे की, आपणा सारख्यांच्या दानातुन हे कार्य लवकर पुर्ण होईल.**



उद्देश आणि ध्येय पूर्तीसाठी आपल्या सर्वांच्या आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. तेव्हा आपण सढळ हाताने दान देऊन या उपक्रमास मदत करावी. बँक अकाऊंटचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| खाते नाव | : | श्रीमती गंगूबाई राघोजी साळवे चॅरिटेबल ट्रस्ट |
| खाते क्रमांक | : | ६०२५७१११०२० |
| बँकेचे नाव | : | बँक ऑफ महाराष्ट्र |
| बँकेचा पत्ता/शाखा | : | कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम) |
| IFSC Code | : | MAHB0001582 |






संपर्क : १) अध्यक्षा, श्रीमती गंगूबाई राघोजी साळवे चॅरिटेबल ट्रस्ट पत्ता क्र.१ अे/५०२, प्रिती पार्क, ओवळा गांव, घोडबंदर रोड ठाणे (प.). पत्ता क्र.२पद्मपाणी घर नं.७१, साई पार्क, एन-७, सिडको, औरंगाबाद

२) के. आर साळवे. मो क्र. 7588680801 ३) मनीष इनरकर मो.क्र. 9920644471

४) पुज्य भन्ते डॉ. भदंन्त एम सत्यपाल मो.क्र. 9403752408

५) पुज्य भन्ते संघपाल मो.क्र.9970418299

इमेल पत्ता : sgrsct2014@gmail.com, salve.krishna435@gmail.com,

वेबसाईट : www.sgrsct.org



Sunrise Printers & Stationers 9545010355